ठाणे, सोमवार दि. २७ मे २०२४ | वर्ष : १३, अंक : २९, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख
**केंद्र सरकारची कामगिरी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर येऊन १० वर्षे झाली. सत्तेत तिसऱ्या टर्मसाठी पंतप्रधान मोदी प्रयत्नशील आहेत. मोदींनी सत्ता हातात...पान २ वर

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®


हृदयाचे ठोके चुकवायला येतोय 'मुंज्या'
...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**
सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



साहेब, या मुलांनी कारने दुचाकीला ठोकले आणि वाहतूक सुरक्षेबद्दल निबंधही लिहून आणला आहे. त्यांना सोडून देऊ काय ?

**थोडक्यात घडामोडी**

## इमारतीच्या गेटवर कार पार्क केल्याने विचारणा करणाऱ्या तरुणावर हल्ला– दोघांवर गुन्हा दाखल

ठाणे – इमारतीतून कार बाहेर काढण्यासाठी आलेल्या तक्रारदार औदुंबर बजरंग किर्दत (३३) यांनी गेट समोर उभ्या कार बाबत सुरक्षा रक्षकाला विचारणा केली. माहिती न मिळाल्याने कार जवळ गेलेल्या तक्रारदार याना पाहून कारमधील सागर वर्मा आणि अनिकेत शेट्टी यांनी मारहाण करून डोक्यात टोकदार वस्तूने प्रहार करून तक्रारदार औदुंबर करदाता याला जखमी केले. रक्तस्राव होत असल्याने प्रथोमचार साई क्लिनिक मध्ये घेऊन सिव्हिल रुग्णालयात उपचार केले. किर्दत यांच्या डोक्यात पाच टाके पडले. या प्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात रविवारी(ता–२६ मे,)रोजी पहाटे सागर वर्मा आणि अनिकेत शेट्टी यांच्या विरोधात हल्ला प्रकरणी गुन्हा दाखल केला.
तक्रारदार औदुंबर बजरंग किर्दत (३३) रा. रम नं ३०२, लोढा कॉम्प्लेक्स अँथेन, माजिवडा ठाणे हे घटनेच्या दिवशी शनिवारी (ता–२५ मे) रोजी रात्री ८–४५ वाजण्याच्या सुमारास सोसायटीच्या ग्वेटमधून वाहन काढण्यासाठी गेटसमोर लावलेल्या कारबाबत **(पान २ वर)**

## पाण्यासाठी नळाचा पाईप न दिल्याचा रागात अल्पवयीन तरुणावर दगडाने केला हल्ला

ठाणे – वाढत उष्मा आणि तापमान, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाद्वारे पाणी कपातीचे धोरण यामुळे ठाण्यात शहरी भागातही पाण्याची वणवण होताना दिसत आहे. सार्वजनिक पाण्याच्या नळाला मोटार लावून पाइपद्वारे पाणी भरणाऱ्या तक्रारदार साहील उर्फ आबीद अबुसाद खान(१७) याच्या हातातील पाईप खेचणाऱ्या रोहीत गुंडीरे याने पाईप देत नसल्याच्या रागात जवळ पडलेल्या दगडाने साहिलच्या कपाळावर प्रहार केला रक्तस्राव होत असताना खाली पडलेल्या तक्रारदार याच्या गुडघ्यावरही दगडाने प्रहार करून जखमी केल्याची घटना बाळकूम पद न १ येथे शनिवारी(ता–२५ मे ) रोजी सकाळी ९ वाजता घडली. या प्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात रोहित नरेश गुंडीरे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पोलीस अधिक तपास करीत आहेत. तक्रारदार साहील उर्फ आबीद अबुसाद खान (१७) रा. दादलानी रोड, **(पान २ वर)**

# पुढील 24 तासांमध्ये मुंबई गारेगार होण्याची शक्यता

## हलक्या पावसाचा अंदाज; कोकणातील समुद्री पर्यटन बंद

चरहरीरिहींर थशरींहशी ढेवू : मुंबई शहर आणि उपनगरांसाठी पुढील २४ तासांमध्ये हलक्या पावसाची शक्यता असून आकाश अंशत ढगाळ राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील २४ तासामध्ये कमाल तापमान ३४ तर किमान तापमान २९ अंश सेल्सिअस राहील असंही सांगण्यात आलं आहे. आजपासून कोकणातील समुद्री पर्यटन पुढचे तीन महिने बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटकांचाही हिरमोड झाल्याचं दिसतंय. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळासह सोसाट्याचा वारा (४०–५० किमी प्रतितास वेग) वाहण्याची शक्यता आहे. या भागात येत्या २४ तासांमध्ये हलका ते माध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि सोसाट्याचा वारा (३०–४० किमी प्रतितास वेग), हलका ते माध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.



### चक्रीवादळ मध्यरात्री धडकणार, हवामान खात्यांची माहिती

भारतीय हवामान खात्याने बंगालच्या खाडीमध्ये रविवारी रात्री चक्रीवादळाचा धोका दिल्यानंतर यंत्रणा सज्ज झाली आहे. पश्चिम बंगालच्या सागरद्विप आणि बांग्लादेशच्या खेपुपुरा येथे हे वादळ धडकणार आहे. या बंगालच्या खाडीमध्ये येणारे मान्सूनपूर्व पहिले चक्रीवादळ आहे आणि हिंदी महासागर क्षेत्रामध्ये या चक्रीवादळाला रेमल नावाने ओळखले जात आहे. रेमल हे नाव ओमान देशाने दिले आहे. कारण रेमल याचा अर्थ वाळू असा आहे. या चक्रीवादळाची सुरवात वाळवंटातून झाली आहे. चक्रीवादळ प्रतितास १२० किमी इतक्या वेगाने मार्गक्रमण करीत **(पान २ वर)**

### महाराष्ट्रात मान्सून १० जूनच्या दरम्यान

मान्सून प्रगतिपथावर असून निम्मे बंगालचे उपसागर क्षेत्र तसेच श्रीलंकेचा भूभाग काबीज केले आहे. मान्सूनचे आगमन ३१ मे दरम्यान केरळात तर १० जूनदरम्यान मुंबईसह कोकणात तर १५ जूनदरम्यान कोकणातून सह्याद्रीचा घाटमाथा ओलांडून नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यात तसेच मराठवाडा, विदर्भात होऊ शकते.

मान्सूनची बंगाल शाखा कदाचित लवकर सक्रिय होऊ शकते. तसे झाल्यास सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी व लगतच्या जिल्ह्यांत, मध्य महाराष्ट्र व खान्देशपेक्षा मान्सूनचे आगमन तेथे अगोदर होऊ शकते. महाराष्ट्रात मे महिन्यातील शेवटच्या आठवड्यात दिवसाच्या उष्णतेबरोबर रात्रीचा उकाडाही अधिक जाणवेल, अशी माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली

# आज दुपारी एक वाजता लागणार दहावीचा निकाल

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं दहावीच्या परीक्षेचा (चरहरीरिहींर डडउ एरा ठशींर्श्रीं २०२४) निकाल २७ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीनं जाहीर केला जाणार आहे. हा निकाल जाहीर करण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीनं पत्रकार परिषद घेतली जाईल. पत्रकार परिषदेतून निकालासंदर्भातील ठळक माहिती दिली जाईल. शैक्षणिक वर्ष २०२३ –२०२४ मध्ये दहावीच्या परीक्षेसाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख ९ हजार ५४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांसह पालकांची निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.बारावीचा निकाल ज्या प्रमाणं ऑनलाईन पद्धतीनं जाहीर करण्यात आला त्याच प्रकारे दहावीचा निकाल देखील जाहीर करण्यात येईल. दहावीचा निकाल खालील वेबसाईटवर २७ मे रोजी दुपारी एक वाजता विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. विद्यार्थी या वेबसाईटना भेट देऊन त्यांची वर्षभरातील कामगिरी कशी राहिली हे निकालाच्या माध्यमातून पाहू शकतात.

### दहावीचा निकाल जिथं पाहणार त्या वेबसाईटची यादी



1. https://mahresult.nic.in
2. http://sscresult.mkcl.org
3. https://sscresult.mahahsscboard.in
4. https://results.digilocker.gov.in
5. https://results.targetpublications.org

### दहावीचा निकाल कसा पाहणार ?

स्टेप १ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ारहीर्शीश्रीं.पळल.ळप या वेबसाईटला भेट द्या.
स्टेप २ : होमपेजवरील दहावीच्या निकालाच्या लिंकवर क्लिक करा.
स्टेप ३ : तुमच्या लॉगीन डिटेल्स, परीक्षा क्रमांक, आईचं नोंदवा.
स्टेप ४ : स्क्रीनवर तुमचा निकाल उपलब्ध होईपर्यंत थांबा.
स्टेप ५: निकाल उपलब्ध झाल्यानंतर तो पीडीएफ फॉरमॅटमध्ये डाऊनलोड करा किंवा त्याची प्रिंट आऊट घ्या.

दहावीचा निकाल ऑनलाईन पद्धतीनं जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याची छापील प्रत काही दिवसांनतर त्यांच्या संबंधित शाळांमध्ये उपलब्ध होईल.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावीच्या परीक्षेचं आयोजन करण्यात आलं होतं. मार्च २०२४ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र म्हणजेच दहावीची परीक्षा पार पडली होती. आता निकाल जाहीर होण्यास काही तासांचा कालावधी राहिल्यानं विद्यार्थ्यांची धाकधुक वाढली आहे.

### दहावीचा निकाल जाहीर होताच अकरावी प्रवेशाला गती

राज्यात अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी पहिल्या टप्प्यातील नोंदणीला २४ मे रोजी सुरुवात झाली आहे. आता दहावीचा निकाल उद्या जाहीर झाल्यानंतर या प्रक्रियेला गती मिळेल. मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर येथील अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनं केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे राबवली जाते.

**मंत्र्यांकडून नियमबाह्य कामांसाठी दबाव!**

# निलंबित अधिकाऱ्याचे सीएम शिंदेंना पत्र; म्हणाला, मंत्री महोदयांच्या दबावामुळे..

**मुंबई – महिला कर्मचाऱ्याचा लैंगिक छळ प्रकरणी आणि विभागातंर्गत आर्थिक घोटाळ्याचा ठपका ठेवत पुणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांना निलंबित करण्यात आलं आहे. राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने ही कारवाई केली आहे. या निलंबित काळात त्यांची बदली नंदुरबारच्या जिल्हा रुग्णालयात करण्यात आली आहे. आता याप्रकरणी डॉ. भगवान पवार यांनी गंभीर आरोप केला आहे. निलंबनाच्या कारवाईनंतर त्यांनी एक पत्र लिहित खळबळजनक गौप्यस्फोट केला आहे.**



डॉ. भगवान पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव आणि अप्पर मुख्य सचिव यांचा उल्लेख केला आहे. यात त्यांनी मंत्री महोदयांनी मला कात्रज कार्यालयात बोलावून नियम बाह्य टेंडरची काम करण्यास सांगितली. त्यासोबतच इतर खरेदी प्रकरणात दबाव आणला. पण मी नियम बाह्य काम केली नाहीत म्हणून माझं निलंबन करण्यात आलं आहे, असा आरोप डॉ. भगवान यांनी केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### डॉ. भगवान पवार यांच्या पत्रातील महत्त्वाचे मुद्दे

मी सार्वजनिक आरोग्य विभागात एकूण ३० वर्षे सेवा केली आहे. यात पुणे आणि सातारा जिल्हा आरोग्य अधिकारी येथे एकूण १३ वर्षे उत्कृष्ट कामकाज केलेले आहे. कोव्हिड १९ च्या काळात मी पुणे जिल्ह्यात जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून उत्कृष्ठ सेवा बजावलेली आहे. सद्यस्थितीत मी आरोग्य अधिकारी (आरोग्य प्रमुख), पुणे महानगरपालिका या ठिकाणी १३ मार्च २०२३ पासून कार्यरत होतो. या ठिकाणी माझ्या कामकाजाबाबत कोणत्याही गंभीर तक्रारी नाहीत अथवा प्रशासकीय चौकशी झालेली नाही. तसेच आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे माझ्या कामकाजाबाबज प्रतिकूल शेरे नाहीत. तरीही शासनामार्फत माझ्या निलंबनाचे आदेश प्राप्त झालेले आहेत आणि हे मला २४ मे २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजता मिळाले.
माझे काम आणि सर्व्हिस रेकॉर्ड उत्तम असताना केवळ मागासवर्गीय अधिकारी म्हणून आणि हेतुपुरस्सरपणे त्रास देण्याच्या हेतून प्रेरिती होऊन माझे निलंबन करण्यात आलेले आहे. मां. मंत्री महोदय यांनी मला पुणे स्थित कात्रज येथील कार्यालयता वारंवार बोलवून नियमबाह्य टेंडरची कामे, खरेदी प्रक्रियेची कामे आणि इतर कामामध्ये मदत करण्यास दबाव आणला होता. परंतु मी नियमबाह्य कामात मदत केली नाही आणि इतर नियमबाह्य कामे केली नाहीत म्हणून माझे निलंबन करण्यात आलेले आहे. मी मॅटमध्ये दावा दाखल केला हा आकस मनामध्ये ठेवून माझी मानसिक छळवणूक सुरु केली होती.
माझे निलंबन हे माझ्या विरुद्ध तक्रारीमध्ये तथ्य नसतानाही त्रास देण्याच्या हेतूने आणि माझे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी मा. मंत्री महोदय यांच्या दबावामुळे केलेले आहे, अशी माझी धारणा आहे. झालेल्या निलंबनामुळे माझे मनोधैर्य खचून गेले असून माझे कुटुंब मानसिक तणावामध्ये आहे. निलंबन करत असताना, माझ्या सध्याच्या कार्यात तक्रारी नसताना केवळ जुन्या तक्रारी शोधून काढून आणि माझे म्हणणे सादर करण्याची कोणतीही संधी न देता माझे निलंबन करुन माझ्यावर अन्याय झालेला आहे, असे डॉ. भगवान पवार यांनी म्हटले. दरम्यान, या पार्श्वभूमीवर आरोग्य सेवा आयुक्तालयाने २९ एप्रिल रोजी तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन **(पान २ वर)**

# टाटा हेवी ट्रकची टाटा एस वाहनाला समोरून धडक; दोन्ही वाहने उलटली





**एकाचा मृत्यू आणि तीन रस्त्यावरील नागरिक जखमी**

ठाणे – तुर्भे ते माणकोली असा प्रवास करणारा टाटा हेवी ट्रक आणि विक्रोळी ते मुंब्रा असा प्रवास करणारा टाटा एस टेम्पो यांची मुंब्रा बायपास रोडवर शनिवारी दुपारी १२–४० वाजण्याच्या सुमर्स क्रमाने–सामने टँकर झाल्याने दोन्ही वाहने रशीद कंपाउंड रस्त्यावर पडल्याचीघटना घडली. या अपघातात सय्यद लाल अहमद जीलानी(६९) याचा मृत्यू झाला. तर झाहीद रफिक खान(१८) आणि भोलेनाथ सिंग (३५) दोघे किरकोळ जखमी झालेले आहेत. तर झाहीद अन्सारी(३५) याला गंभीर दुखापत झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. .
शनिवारी दुपारी १२–४० वाजण्याच्या सुमारास मुंब्रा बायपॅड रोडवर व्हाय जंक्शन जवळ सदरचा अपघात घडला. टाटा हेवी ट्रक अज्ञात चालक हा तुर्भे ते मानकोलीअसा प्रवास करीत होता. तर टाटा एस हे वाहन चालक भोलेनाथ सिंग हा विक्रोळी ते मुंब्रा असा प्रवास करीत हता. **(पान २ वर)**

### वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला केली

मुंब्रा बायपास वाय जंक्शन येथे व्हॅनची टक्कर होऊन वाहने खाली रशीद कंपाउंड परिसरात पडल्याची माहिती मिळताच घटनास्थळी शहर वाहतूक पोलीस कर्मचारी, मुंब्रा पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी मदतकार्य आणि वाहतूक मोकळी करणायचा प्रयत्न केला. तर वाहतूक पोलिसांनी दोन क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला केली. सदरचा रोड वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला.

### रशीद कंपाउंड परिसरात बघ्याची तोबा गर्दी

दोन्ही वाहनांची समोरासमोर टक्कर झाल्याने दोन्ही गाड्या या रशीद कंपाउंड परिसरात खाली रस्त्यावर पडल्या यात तीन जखमी एकाच मृत्यू झाल्याने खाली पडलेली वाहने ही पाहण्यासाठी आणि मदत कार्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केलेली होती. तर हेवी टाटा ट्रकचा चालक याने पलायन केले. या घटनेमुळे मुंब्रा बायपासवर काही काळ वाहतुकीची कोंडी सदृश्य परिस्थिती पाहायला मिळाली तर मोठी बघायची गर्दीही जमलेली होती. जखमींना त्वरित उपचहरासाठी आसपासच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## केंद्र सरकारची कामगिरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर येऊन १० वर्षे झाली. सत्तेत तिसऱ्या टर्मसाठी पंतप्रधान मोदी प्रयत्नशील आहेत. मोदींनी सत्ता हातात घेतल्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे प्रयत्न केले. २०१४ ते २०२४ हे दशक भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आश्वासक की मारक असा प्रश्न नेहमीच चर्चिला जातो. गेल्या दहा वर्षांत आर्थिक सुधारणा, पायाभूत सुविधांचा विकास आणि सामाजिक कल्याण यांच्या कामगिरीवर केंद्र सरकारने भर दिला असल्याचे दिसते. नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पदभार स्वीकारला, त्यावेळी भारताची अर्थव्यवस्था मंदावली होती. इतर कारणांसह भ्रष्टाचार प्रकरणांमुळे गुंतवणूकदारांचा अर्थव्यवस्थेवरील आत्मविश्वास कमी होत होता. परंतु गेल्या दशकात भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजे जिदडीपीमध्ये दरडोई लक्षणीय वाढ झाली आहे. २०१४ मध्ये दरडोई जीडीपी अंदाजे ५००० डॉलर होता; २०२२ पर्यंत तो ७ हजार डॉलरपेक्षा जास्त वाढला होता, जो जवळपास ४० टक्क्यांनी वाढला, असे द कॉन्व्हर्सेशनमधील एका निबंधात नमूद करण्यात आले आहे. हा वाढीचा मार्ग लोकांच्या क्रयशक्तीच्या समतेवर आधारित आहे. क्रयशक्ती म्हणजे खरेदीदारांची वस्तू विकत घेण्याची क्षमता होय.आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार, भारताची अर्थव्यवस्था २०२४ मध्ये ६.५ टक्के दराने वाढण्याचा अंदाज आहे. चीनच्या ४.६ टक्क्यांच्या अंदाजित विकासाला मागे टाकून आणि युनायटेड किंगडमच्या ०.६ टक्क्यांच्या अपेक्षित वाढीपेक्षा खूप जास्त आहे. ही सातत्यपूर्ण कामगिरी भारताची मजबूत आर्थिक धोरणे आणि विकास धोरणे अधोरेखित करते. मोदी सरकारच्या महत्त्वपूर्ण यशांपैकी एक म्हणजे आधार प्रणालीची अंमलबजावणी आहे. तसेच फिंगरप्रिंट्स आणि डोळ्यांच्या स्कॅनशी जोडलेला डिजिटल आयडी आहे. जवळपास ९९ टक्के भारतीय प्रौढांनी आता या प्रणालीमध्ये नावनोंदणी केली आहे, ज्यामुळे ते थेट लाभ हस्तांतरणासाठी सक्षम आहेत. त्यामुळे लाभ इच्छित प्राप्तकर्त्यांपर्यंत कार्यक्षमतेने पोहोचतात. यात भ्रष्टयाचाराचा धोका कमी आहे.केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात ग्रामीण रस्ते बांधणी कार्यक्रमासह व्यापक पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू केले आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना दिल्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक हालचालींनाही चालना मिळाली आहे. पंतप्रधान जण धन योजनेअंतर्गत प्रत्येक भारतीय नागरिकाला बँक खात्यात प्रवेश आहे, याची खात्री करून आर्थिक समावेश वाढवणे हा आहे. जानेवारी २०२४ पर्यंत एकूण २१५,८०३.१७ कोटी रुपये ठेवीसह ५१.५० कोटी जण धन खाती आहेत. कुटुंबांकडे असलेल्या शेअर्स आणि डिबेंचर्सचे मूल्य २०१४ मध्ये १८,९३० कोटी रुपयांवरून १०३१ टक्क्यांनी वाढून २०२३ मध्ये २,१४,१९१ कोटी रुपये झाले. व्यवस्थापनाखालील म्युच्युअल फंडांची संपत्ती ८ रुपयांवरून ३७८ टक्क्यांनी वाढली. २०१४ मध्ये २५,२४० कोटी रुपये २०२३ मध्ये ३९,४२,०३१ कोटी रुपयांवर पोहोचले. बचत ठेवींमध्येही १९७ टक्क्यांनी वाढ झाली, ज्यामुळे भारतीयांमधील वाढती आर्थिक साक्षरता आणि गुंतवणुक वाढली.भारताच्या परकीय चलनाच्या साठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. यात २०१४ मधील ३०४ अब्ज डॉलरवरून फेब्रुवारी २०२४ मध्ये ६४२ अब्ज डॉलरपर्यंत वाढ झाली आहे. ही वाढ मजबूत विदेशी थेट गुंतवणुकीचा ओघ, मजबूत निर्यात आणि रिझर्व्ह बँकेच्या विवेकपूर्ण विदेशी चलन व्यवस्थापनामुळे झाली आहे. कोविड १९ साथीच्या रोगाला मोदी सरकारचा प्रतिसाद कल्याणकारी कार्यक्रमांमध्ये लक्षणीय विस्ताराने अधोरेखित करण्यात आला आहे. अन्न अनुदान बिल २०१९–२०२० आणि २०२१–२०२२ दरम्यान जवळजवळ पाच पटीने वाढले, ज्यामुळे लोकसंख्येसाठी अन्नधान्य परवडणारे प्रवेश सुनिश्चित झाले. शौचालये आणि स्वयंपाकाच्या सिलिंडरचा मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात आला. वीज उपलब्ध असलेल्या भारतीय खेड्यांचे प्रमाण २०१४ मध्ये ८८ टक्क्यांवरून २०२० मध्ये ९९.६ टक्क्यांवर पोहोचले. हे जलद विद्युतीकरण ग्रामीण भागातील जीवनमान आणि आर्थिक उत्पादकता सुधारण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहे. पायाभूत सुविधांतील गुंतवणुकीमुळे संपर्क वाढला. व्यापार आणि वाणिज्य सुलभ झाले.

२०२४–२५ साठी राजकोषीय तूट जीडीपीच्या ५.१ टक्के असण्याचा अंदाज आहे. २०२६ पर्यंत ४.५ टक्क्यांचे उद्दिष्ट आहे. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सारख्या प्रमुख राजकोषीय धोरणातील बदलांमुळे कर प्रशासन सुव्यवस्थित झाले आहे आणि महसूल वाढला, असे केंद्र सरकारने म्हटले आहे. परंतु केंद्र सरकारने राबवलेल्या जीएसटी कार्यक्रमावर अनेक टीका झाल्या आहेत. याचे कारण म्हणजे जीएसटी राबवल्यामुळे लघुउद्योजक ढासळले आणि बेकारी वाढली. तसेच त्याचा व्यापारावर विपरीत परिणाम झाला आणि अर्थव्यवस्था डबघडीला आली. केंद्र सरकारने राबवलेल्या योजना पुरेशा नाहीत याचे कारण म्हणजे देशात वाढत असलेली महागाई, बेरोजगारी आणि गरिबी होय. यामुळेच केंद्र सरकारच्या कारभारावर टीका होत आहे. केंद्र सरकार कागदावरील आकड्यांचा खेळ खेळत असल्याची टीकाही विरोधकांकडून होत आहे. तसेच देशात विरोधकांवर केंद्र सरकार राजकीय दबाव व राष्ट्रीय तपास यंत्रणेचा दबाव टाकत असल्याचे दिसते. यामुळेही केंद्र सरकारबद्दल जनतेच्या मनात नकारात्मक प्रतिक्रिया असल्याचे दिसून येते. केंद्र सरकारचे काही निर्णय चांगले तर काही निर्णय अतिशय वाईट आहेत. गेल्या दहा वर्षाच्या केंद्र सरकारच्या कामगिरीमुळे सद्यस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या निकालावर नेमका काय परिणाम होतो हे येत्या ४ जूनला समजेल.

आयकर विभागाचा छापा

# बंगल्यातील फर्निचर फोडून काढल्या नोटा, २६ कोटींची रोकड अन्..

**नाशिक – शहरातील सराफ व्यवसायिकांकडे गेल्या दोन दिवसांपासून आयकर विभागाची छापेमारी सुरू आहे. नाशिकच्या कॅनडा कॉर्नर परिसरात असलेल्या एका ज्वेलर्सच्या दुकानावर तसेच त्यांच्या निवासस्थानावर आणि इतर ठिकाणी आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ३० तासांपासून तपासणी सुरू आहे. एकाच ज्वेलर्सच्या दोन दालनांमध्ये तपासणी सुरु होती. नाशिक, नागपूर, जळगावच्या पथकातील ५० अधिकाऱ्यांची एकाच वेळी कारवाई केली. या छापेमारीत बंगल्यातील फर्निचर फोडून आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी नोटा काढल्या.**

### पोलीस बंदोबस्तात छापेमारी...

नाशिक शहरात सराफ व्यवसायिक आणि बांधकाम व्यवसायिकांवर गुरुवारपासून आयकर विभागाकडून छापेमारी करण्यात आली. अचानक झालेल्या छापेमारीत कर बुडव्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले. मागील काही दिवसांपासून कर बुडवे व्यवसायिक हे आयकर विभागाच्या रडारवर होते. त्यानुसार आयकर विभागाचे अधिकारी खासगी वाहनातून नाशिकमध्ये दाखल झाले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी छापेमारी सुरू केली. ज्या ठिकाणी छापेमारी सुरू होती, त्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.



### ९० कोटींच्या बेहिशोबी मालमत्ता

नाशिकमध्ये बड्या सराफी व्यवसायिकावर आयकर विभागाने छापेमारीची बातमी शहरात सर्वत्र पसरली. त्यानंतर त्याची चर्चा सुरु झाली. आयकर विभागाच्या छाप्यात २६ कोटींची रोकड तर ९० कोटींच्या बेहिशोबी मालमत्तेची दस्तऐवज जप्त करण्यात आले. सलग तीस तास ही तपासणी करण्यात आली. आयकर चुकवल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली.

### मनमाडमध्ये छापेमारी

नाशिकप्रमाणे मनमाड शहरात आयकर विभागाने छापेमारी केली. मालेगावमधील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या एका उद्योगपतीच्या घरावर आणि कार्यालयावर प्राप्तिकर विभागाने छापा टाकला. ज्या उद्योगपतीच्या घर आणि उद्योगावर छापा टाकला त्याचे वेगवेगळे व्यवसाय आहेत. याबाबत आयकर विभागाकडून कमालीची गुप्तता पाळण्यात आली.

मागील काही महिन्यांपासून राज्यातील विविध ठिकाणी आयकर विभागाकडून छापेमारी केली जात आहे. या छापेमारीत मोठ्या प्रमाणावर बेहिशोबी रक्कम उघड होत आहे. परंतु त्याची अधिकृत माहिती आयकर विभागाकडून दिली जात नाही. आता नाशिक शहरातील सराफा व्यावसायिकांवर पडलेल्या धाडीमुळे खळबळ उडाली आहे.

## डॉ. भगवान पवार यांच्या पत्रातील महत्त्वाचे मुद्दे

**(पान १ वरून)** केली होती. पवार यांच्याविरुद्ध तक्रारीचे गंभीर स्वरूप पाहता निष्पक्ष चौकशी होण्याच्या दृष्टीने त्यांचे निलंबन करणे आवश्यक आहे, अशी शिफारस समितीने केली होती. त्यानुसार भगवान पवार यांचं निलंबन करण्यात आलं होतं.

## टाटा हेवी ट्रकची टाटा एस वाहनाला समोरून धडक...

**(पान १ वरून)** दोन्ही वाहने हि मुंब्रा बायपास रोडवर वाय जंक्शन येथे आले असता दोन्ही चालकाच्या संभ्रम स्थितीमुळे वाहने हि समोरासमोर एकदुसर्याला धडकली. दोन वाहनाच्या धडकेने दोन्ही वाहने हि खाली रशीद कंपाउंड रस्त्यावर पडली. या वाहनांमुळे सय्यद लाल अहमद जीलानी यांचा रुग्णालयात उपचाहरदरम्यान मृत्यू झाला. तर अन्य तीन रस्त्यावरील नागरिक जखमी झाल्याची घटना घडली.

## इमारतीच्या गेटवर कार पार्क केल्याने विचारणा करणाऱ्या....

**(पान १ वरून)** सुरक्षा रक्षकाला विचारणा केल्यानंतर व्यवस्थित माहिती न मिळाल्याने तक्रारदार स्वतः कारजवळ गेल्यानंतर कार मधून सागर आशाराम वर्मा(२३) किसन मुलुंडकर शंकर मंदिर पाठीमागे, माजीवडा गाव, ठाणे पश्चिम व अनिकेत शेखर शेट्टी(२५) रा, न्यू इंद्रजीत अपार्टमेंट, ए ५०१, माजीवाडा, ठाणे पश्चिम हे दोघे कारमधून उतरले. त्यांना विचारले असता जग तुझी आहे काय? आता गाडी येथेच लावणार असे म्हणत शिवीगाळी आणि मारहाण सुरु केली. त्यात लोखंडी टोकदार वस्तूने डोक्यात प्रहार केला. डोक्यातून रक्तस्त्राव झाल्याने ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयात दाखल होऊन उपचार घेतले. या प्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात सागर आशाराम वर्मा आणि अनिकेत शेखर शेट्टी यांच्या विरोधात मारहाण आणि हल्ल्याचा गुन्हा दाखल केला. कापूरबावडी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पाण्यासाठी नळाचा पाईप न

## दिल्याचा रागात अल्पवयीन तरुणावर...

**(पान १ वरून)** पाईप लाईन एसराज हिल चाळ येथील कृष्णा पाटील पाटील यांचे खोलीत भाडोत्री बाळकुम पाडा नं.१ ठाणे. हा घटनेच्या दिवशी शनिवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास सार्वजनिक नळावर पाणी भरण्याचा नंबर आल्यामुळे पाईप घेऊन पाणी भरत असताना मागच्या चाळीत राहणारा रोहीत गुंडीरे याने साहिलच्या हातातील पाण्याचा पाईप घेण्यासाठी झटापट केली. मात्र साहिलने पाण्याचा पाईप रोहित याला न दिल्याने त्याचा राग आल्याने रोहित गुंडीरे याने जवळचा दगड उचलून साहिलच्या कपाळावर मारला साहिल खाली पडल्यानंतर त्याच्या गुडघ्यावरही दगडाने मारून जखमी केले. साहिलला जखमी अवस्थेत बाळकूमच्या अष्टविनायक हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले. या प्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात रहित गुंडीरे याच्या विरोधात हल्ल्याचा गुन्हा दाखल केला. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## चक्रीवादळ मध्यरात्री धडकणार....

**(पान १ वरून)** असून रविवारी रात्री हे वादळ सीमावर्ती भागात धडकणार आहे त्यामुळे यंत्रणेला अलर्ट करण्यात आले आहे. उत्तरी ओडिसाच्या किनारपट्टीवरील गावांना अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या वादळांत शेतीसह वनसंपत्तीचे आणि मनुष्य आणि वित्तहानीचा धोका वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे किनारपट्टीवरून लोकांना दूर हाकलण्यात आले आहे. बंगालच्या खाडीमध्ये समुद्राचे तापमान ३० डिग्री सेल्सिअस आहे आणि बंगालची खाडी व अरबी समुद्र देखील उष्ण आहे. त्यामुळेच उष्णकटिवद्वीय चक्रीवादळ उग्र स्वरूप धारण करू शकते. हे वादळ वायू मंडळात महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात असे हवामान खात्याने म्हटले आहे. तामिळनाडू आणि ओरिसासह आसामपर्यंत या वादळाचा तडाखा बसणार आहे. हे वादळ मध्यरात्री धडकणार असल्याने काळजी वाढली आहे.

# उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांचा सीएम शिंदे आणि आशिष शेलार यांना टोला

नालेसफाईचा पाहणी दौरा करायचाच आहे ,तर आधी स्वतःचा विधानसभा मतदारसंघ आणि श्रीमंत ठाणे महापालिका बघा... जिथे सध्या विकास कामांसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या देणीसाठी शासनाच्या निधीवर अवलंबून असलेली २२ वर्षे ठाणे महापालिका तुमच्या ताब्यात एक हाती आहे, मग दरवर्षी ठाण्यात नाळेसफाईची बोंब का असते? स्वतःच्या कोपरी पाचपखाडी मतदार संघात वागळे इस्टेट इंदिरानगर, हजुरी, कोपरी विभाग, आणि जिथून तुमची राजकीय कारकीर्द नगरसेवक म्हणून सुरू झाली तो किसन नगर २ परिसर पावसात पाण्याखाली का असतो तेथील नाले बांधणी आणि नालेसफाई तुम्ही योग्य पद्धतीने का झालेली नाही. तुम्हाला उत्तम आपत्ती व्यवस्थापन असलेली मुंबईच चुका काढण्यासाठी आठवते कारण ती बाळासाहेबांच्या ताब्यात होती आणि बाळासाहेबांनंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केलेली कामे आणि मुंबईच्या भवितव्यासाठी ८० हजार कोटी च्या सुरक्षा ठेवी हे बघून पोटात दुखते की दिल्ली जशी खेळण्याला जेवढी चावी देते त्याप्रमाणे तुम्ही चालता आणि बोलता.?

मागील अडीच वर्षे मुंबई महापालिकेवर आणि इतर सर्व महापालिकेवर प्रशासकांची सत्ता आहे म्हणजेच राज्य शासनाची सत्ता आहे असे असताना सर्व जबाबदारी मग कोणावर येते हे जरा समजून घ्या आणि त्या आशिष शेलारांना पण ठाण्यात नालेसफाई चे दौरे करायला पावसाळ्यापूर्वी आणि भर पावसाळ्यात सोबत घेऊन या. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण दिल्लीच्या कृपेने प्राप्त होऊन तुम्हाला



समाधान मिळालं नाही... आधी स्वतःचा मतदारसंघ साफ करा... मग इतरांना ज्ञान द्या! असा सणसणीत टोला पुराव्यानिशी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख तथा माजी नगरसेवक संजय घाडीगावकर यांनी लगावलेला आहे.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग,

निविदा सूचना

ठाणे महापालिका हद्दीतील कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षका अंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कळवा प्रभाग समिती अंतर्गत विविध रस्त्यांची दुरुस्ती करणे (सन २०२४-२५) या एका कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेत स्थळ https:/mahatendrs.gov.in वर दि.२७.५.२०२४ ते दि.१०.६.२०२४ पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.१०.६.२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.१२.६.२०२४ रोजी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न दाखविता नाकारणेचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-क.प्र.स/३९/२०२४-२५ सही/-
दि.२४.०५.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

**पाणी अनमोल आहे, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा**
**पाणी वाचवा, पाण्याचा अपव्यय/नासाडी टाळा..!**



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00192/18/24
Inquiry/case No. : ACC/II/19/2024
Name of the Trust : PADAMSHRI BRAHMDEO RAM PANDIT CERAMIC ARTS FOUNDATION
**Address of the Trust :** KALAKAR NIVAS, NEAR SYNDICATE PANCHAL UDYOG NAGAR, BHAYANDER EAST, THANE,
**Name of the Applicant :** BRAHMADEO RAM PANDIT

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 30/04/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor,
Administrative Office "B" Govt. Offices Complex,
Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

**Public Notice**

Service Request Number : PLG/01450/18/24
Inquiry/case No. : . **ACC/264/2024**
Name of the Trust : **MANGALYA PATIL PARIVAR SHRIKHANDOBA TRUST**
**Address of the Trust : GAWARAI PADA, SOPARA, TAL. VASAI, PALGHAR, PALGHAR, PALGHAR.**
**Registration Number of the Trust (if)** : MANGALYA PATIL PARIVAR SHRIKHANDOBA TRUST
**Name of the Applicant :** MR. GANESH BALKRISHNA PATIL

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 24/05/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar



Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor,
Administrative Office "B" Govt. Offices Complex,
Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

**Public Notice**

Service Request Number : PLG/01615/18/24
Inquiry/case No. : . **ARS/272/2024**
Name of the Trust : **MAA GANGOTRI CHARITABLE TRUST**
**Address of the Trust : C-WING, 1ST FLOOR - 101, SHEETAL DEEP, NEAR RAILWAY STATION, NALLASOPARA (W), PALGHAR, PALGHAR, PALGHAR**
**Registration Number of the Trust (if)** : MAA GANGOTRI CHARITABLE TRUST
**Name of the Applicant :** MR. RAMKRIPAL UMESHCHANDRA TRIPATHI

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 24/05/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती

- पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
- शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
- वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

- कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५

जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.

पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)

- शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
- शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.

छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. –

वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
- मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

## यूपीएससीमार्फत संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा २०२४

- परीक्षेचे नाव: संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (CDS-II) २०२४
- पदाचे नाव/कोर्सचे नाव

१ भारतीय भूदल (मिलिटरी) अकॅडेमी, डेहराडून १५९
२ भारतीय नेव्हल अकॅडेमी, एझीमाला, Executive (General Service)/Hydro
३ हवाई दल अकॅडेमी, हैदराबाद,No. 218 F(P) Course
४ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी (पुरुष) चेन्नई, 122nd SSC (Men) Course (NT)
५ ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमी (महिला) चेन्नई,-36th SSC Women (Non-Technical) Course

- जागा : ४५९
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: पदवीधर.
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: पदवी (Physics and Mathematics at 10+2 level) किंवा इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.४: पदवीधर.
पद क्र.५: पदवीधर.

- वयाची अट:

पद क्र.१: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.२: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.३: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००५ दरम्यान.
पद क्र.४: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.५: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ जून २०२४
- लेखी परीक्षा: ०१ सप्टेंबर २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://upsc.gov.in/

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## सीमा सुरक्षा दल

- combatised/group_B/2024 1 इंस्पेक्टर (Librarian)
- combatised/group_B_C/2024 2 सब इंस्पेक्टर (Staff Nurse)
- असिस्टंट सब इंस्पेक्टर (Lab Tech)
- असिस्टंट सब इंस्पेक्टर (Physiotherapist)
- SMT_WKSP/२०२४ सब इंस्पेक्टर (Vehicle Mechanic)
- कॉन्स्टेबल (OTRP)
- कॉन्स्टेबल (SKT)
- कॉन्स्टेबल (Fitter)
- कॉन्स्टेबल (Carpenter)
- कॉन्स्टेबल (Auto Elect)
- कॉन्स्टेबल (Veh Mech)
- कॉन्स्टेबल (BSTS)
- कॉन्स्टेबल (Upholster)

Veterinary_Staff/2024 हेड कॉन्स्टेबल (Veterinary)

- हेड कॉन्स्टेबल (Kennelman)
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: ग्रंथालय विज्ञान किंवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयात पदवी.
पद क्र.२: (१) १२वी उत्तीर्ण (२) जनरल नर्सिंग डिप्लोमा/पदवी
पद क्र.३: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) डीएमएलटी
पद क्र.४: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) फिजियोथेरपिस्ट डिप्लोमा/पदवी (३) ०६ महिने अनुभव
पद क्र.५: ऑटोमोबाईल/ मेकॅनिकल डिप्लोमा/पदवी
पद क्र.६ ते १३: (१) १०वी उत्तीर्ण (२) संबंधित ट्रेड मध्ये
पद क्र.१४: (१) १२वी उत्तीर्ण (२) व्हेटर्नरी स्टॉक असिस्टंट कोर्स (३) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.१५: (१) १०वी उत्तीर्ण (२) शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा पशुवैद्यकीय महाविद्यालय किंवा शासकीय पशु फार्म येथून जनावरे हाताळण्याचा दोन वर्षांचा अनुभव.

- वयाची अट: १७ जून २०२४ रोजी, /: ०५ वर्षे सूट, : ०३ वर्षे सूट

पद क्र.१ ५: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.२: २१ ते ३० वर्षे
पद क्र.३: १८ ते २५ वर्षे
पद क्र.४: २० ते २७ वर्षे
पद क्र.६ ते १५: १८ ते २५ वर्षे

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी /: फी नाही

पद क्र.1,2, 5, 14 & 15: General/OBC/EWS: ₹200/-
पद क्र..3,4, 6 ते13: General/OBC/EWS: ₹100/-

- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

## भारतीय सैन्य १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स

- कोर्सचे नाव: १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स ५२-जानेवारी २०२५
- शैक्षणिक पात्रता: ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण २०२४ मध्ये उपस्थित.
- वयाची अट: जन्म ०२ जुलै २००४ ते ०१ जुलै २००७ च्या दरम्यान.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १३ जून २०२४ (१२:०० )
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

सभासद व्हा
....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

# उष्माघात टाळण्यासाठी आहारात काय वापराल?

यावर्षी भारतात मुंबईसह अनेक ठिकाणी तापमानाने उच्चांक गाठला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार ३१-३५ अंश असणारे तापमान प्रत्यक्षरित्या ४१-४५ अंशांपर्यंत वाढलेले होते. साधारणपणे सकाळी १० नंतरच असह्य उष्मा जाणवतो आहे. अलीकडे तर बॉलीवूड सेलिब्रिटी असलेल्या शाहरूख खानलाही उष्माघाताचा त्रास झाला आणि रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. अशा परिस्थितीत उष्माघाताचा त्रास टाळण्यास, शरीरातील तापमान राखण्यासाठी काय करता येईल याबद्दल आजच्या लेखात! अतिरेकी उष्माघातामुळे मानवी आरोग्यावर विविध परिणाम होऊ शकतात. उदाहरणार्थ: भरपूर घाम येणे, शरीरातील पाणी कमी होणे, तहान लागणे, भूक कमी लागणे, खूप थकवा येणे, शरीरातील क्षारांचे प्रमाण कमी होऊन अशक्तपणा येणे, हृदयाचे ठोके वाढणे, रक्तदाब वाढणे, स्नायूंमध्ये थकवा जाणवणे, डोकेदुखी जाणवणे

निसर्गनियम म्हणून प्रत्येक ऋतूत त्या त्या ऋतूला साजेशी फळे, भाज्या बाजारात उपलब्ध असतात. त्यापासून विविध प्रकारचे पदार्थ ऋतुमानानुसार पिढ्यानपिढ्या घराघरात केले जातात. त्याबद्दल थोडेसे

### पन्हं

उन्हाळ्यात शरीरात जीवनसत्त्व क भरपूर प्रमाणात असल्यास उत्तम परिणाम मिळतात. उन्हाळ्यात कच्ची कैरी, आलं आणि पाणी यांचे मिश्रण करून पन्हं तयार केले जातं. उन्हाळ्याच्या दिवसात कैरीचे पन्हं शरीरासाठी अत्यंत गुणकारी ठरतं. उन्हाळ्यात घामाच्या धारा कमी करण्यासाठी पन्हं अत्यंत उपायकारक ठरतं.

### आवळा रस किंवा सरबत

उन्हाळ्यात शरीरात क्षारांचे प्रमाण राखण्यासाठी आवळा वाळवून त्यात मीठ साखरेचे आवश्यक प्रमाण एकत्र करून केलेलं सरबत उन्हाळ्यात अत्यंत गुणकारी ठरतं. स्वादुपिंडाच्या आरोग्यासाठीदेखील आवळा सरबत गुणकारी आहे. आवळ्याचा तुरटपणा कमी करण्यासाठी या सरबतासोबत गूळ जरूर वापरावा.

### ताडगोळा

उन्हाळ्यात बाजारात प्रामुख्याने मिळणारे हे फळ बाहेरून हिरवट तांबडे दिसते. छोटेखानी शहाळ्यासारखे दिसणारे हे फळ आतून मऊ आणि रसाळ असते. चवीला गोड आणि तुरट यांचे मिश्रण असणारे हे फळ उन्हाळ्यात शरीरासाठी सर्वोत्तम मानले जाते. एकाच वेळी भूक आणि तहान दोन्ही शमविणारे आणि योग्य प्रमाणात ऊर्जा पुरविणारे हे फळ क्षार, कर्बोदके आणि ऊर्जा यांचे योग्य मिश्रण असणारे आहे.

### वाळ्याचे सरबत

वाळा म्हणजे वरवर तांबडं दिसणारे हे औषधी मूळ शरीरातील उष्णता कमी करण्यास्तवही तसेच उन्हाळ्यात शरीराचे तापमान राखण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. वाळा पाण्यात भिजवून त्याचे सरबत आहारात समाविष्ट केल्यास शरीरात उन्हामुळे वाटणारी लाही कमी होण्यास मदत होते. ज्यांना अस्थमा किंवा दमा आहे त्यांनी वाळ्याचे अतिरेकी प्रमाण टाळावे

### गुलाबाच्या पाकळ्यांचे पाणी

गुलकंद उन्हाळ्यात नियमितपणे खावा याबद्दल नेहमी सांगितले जाते. त्याचप्रमाणे गुलाबाच्या भिजविलेल्या पाकळ्यांचे पाणी देखील उष्माघाताचे परिणाम कमी करण्यासाठी गुणकारी ठरते.

### जाम

लालसर रंगाचे काजूसारखे दिसणारे हे फळ उन्हाळ्यात आर्द्रता वाढविणारे, भूक शमविणारे आणि शरीरातील साखर नियंत्रणात राखणारे आहे. जाम हे फळ आहारात सॅलड सोबत समाविष्ट केल्यास विशेष चविष्ट लागते.

### काकडी

काकडीचा रस, काकडीचा कोरडा, काकडीचे धिरडे अशा विविध स्वरूपात काकडी आहारात समाविष्ट केली जाऊ शकते. काकडी हे ७०-८०% पाणी असते. काकडीचा रस केवळ उष्णता कमी करण्यासाठीच नव्हे तर उच्च रक्तदाब आटोक्यात आणण्यासाठी देखील उपयुक्त आहे.

### जास्वंद फूल

ज्यांना चहा वारंवार पिण्याची सवय आहे, त्यांच्यासाठी जास्वंदाच्या फुलाच्या चहाने उत्तम परिणाम मिळतात. गरम किंवा थंड अशा दोन्ही स्वरूपात जास्वंदांच्या फुलाचा अर्क चहाऐवजी प्यायला जाऊ शकतो.

### ज्येष्ठमध

आयुर्वेदातदेखील औषधी मानली जाणारी ज्येष्ठमध उन्हाळ्यातून पाण्यात उकळून पिण्यासाठी गुणकारी आहे. ज्येष्ठमधाचा अर्क काढून तो रोज अर्धा चमचा खाल्ल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढण्यात मदत होते . शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करणे, उष्णता कमी करणे तसेच उन्हाळ्यातून होणाऱ्या सर्दी -खोकला पडसे यात औषध म्हणून ज्येष्ठमध उपयुक्त आहे . मधुमेहींसाठी ज्येष्ठमध उकळून केलेला आयुर्वेदिक चहा उन्हाळ्यातून अत्यंत उपायकारक ठरतो.



# हृदयाचे ठोके चुकवायला येतोय 'मुंज्या'

जरी भयपट पाहत असताना धडधड होत असली तरीदेखील असे चित्रपट पाहण्यासाठी लोक आतुरलेले असतात. सध्या सोशल मिडीयावर आदित्य सरपोतदार यांच्या 'मुंज्या' चित्रपटाच्या ट्रेलरची जोरदार चर्चा होताना दिसतेय. भयपट असलेल्या मुंज्याच्या चित्तथरारक टीजरनंतर त्याचा ट्रेलरसुद्धा नुकताच रीलिज झालाय. अभय वर्मा, शर्वरी वाघ आणि मोना सिंघ अशी स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाच्या ट्रेलरमधील एक-एक दृश्य मजेदार आहे. हा चित्रपट जरी भयपट असला तरी याची कहाणी विनोदी संवादांनी भरलेली आहे. ट्रेलर पाहून तर नेटकरी खो खो हसत सुटलेले पाहायला मिळत आहेत.

भयपट पाहणे कोणाला आवडत नाही ? जरी भयपट पाहत असताना धडधड होत असली तरीदेखील असे चित्रपट पाहण्यासाठी लोक आतुरलेले असतात. सध्या सोशल मिडीयावर आदित्य सरपोतदार यांच्या 'मुंज्या' चित्रपटाच्या ट्रेलरची जोरदार चर्चा होताना दिसतेय. यामागचं कारण म्हणजे या चित्रपटामध्ये अनेक मराठी कलाकर प्रमुख भूमिकेत आहेत. हा भयपट येत्या ७ जूनला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे.

या चित्रपटाच्या सुरुवातीलाच आपल्याला एक जंगल दिसतं. त्या जंगलात एक शापित ठिकाण आहे. ज्या ठिकाणी असतो तो म्हणजे मुंज्या. ट्रेलरमध्ये मुंज्या आणि मुन्नीचं प्रेमप्रकरण दाखवलं आहे. दोघांनाही लग्न करायचं असतं पण त्यांची लग्न करायची इच्छा अपूर्णच राहते कारण मुंज्याचा लग्नापूर्वीच मृत्यू होतो. त्याचे अंत्यसंस्कार जिथे केलेले असतात तिथला काही भाग शापित असतो. जंगलातील त्या शापित भागाजवळ गेलेल्या मुलाला मुंज्या झपाटतो आणि त्या मुलासोबत मुंज्यादेखील मुन्नीला शोधायला शहरात येत असल्याचं आपल्याला या ट्रेलरमध्ये पाहायला मिळतं. शहरात आलेल्या त्या मुलाला आणि मुंज्याला मुन्नी भेटते का ? त्यांची अधुरी प्रेमकहाणी पूर्ण होते का ? या प्रश्नांची उत्तरं आपल्याला चित्रपटातूनच पाहायला मिळतील.

या चित्रपटाची निर्मिती 'स्त्री' चित्रपटाचे निर्माते मॅडॉक फिल्म्सने केली आहे. चित्रपटामध्ये मुख्य भूमिकेत अभय वर्मा, शर्वरी वाघ, मोना सिंग हे कलाकार आहेत तर सुहास जोशी, रसिका वेंगुर्लेकर, भाग्यश्री लिमये आणि शर्वरी वाघ हे मराठमोळे कलाकारही या चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या भेटीस येतील.

### पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी नीरज चोप्राला दुखापत

# भारताच्या सुवर्णपदकाच्या आशांना धक्का?

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा २८ मे रोजी ऑस्ट्रावा गोल्डन स्पाइक २०२४ मध्ये सहभागी होणार नाही. याबाबत दुजारा देताना आयोजकांनी सांगितले की, दुखापतीमुळे तो या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही. मात्र, तो या कार्यक्रमाला पाहुणा म्हणून उपस्थित राहणार आहे. अलीकडेच चोप्राने दोहा डायमंड लीग आणि फेडरेशन कपमध्ये भाग घेतला होता. त्याचबरोबर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नीरज चोप्राकडून देशाला पदकाची सर्वात मोठी आशा आहे. आता त्याच्या दुखापतीमुळे चिंता वाढली आहे.

### नीरज चोप्राला कुठे दुखापत झाली?

नीरज चोप्राला त्याच्या डक्टर स्नायूंना दुखापत झाली आहे. हे स्नायू मांडीच्या आतील भागात असतात. नीरजची तपासणी केली जात असून त्यानंतर रिहॅबिलिटेशनची प्रक्रिया सुरू करता येणार आहे. नीरज चोप्रा २८ मे रोजी होणाऱ्या ऑस्ट्रावा गोल्डन स्पाइक मीटमध्ये सहभागी होईल अशी अपेक्षा होती, पण या दुखापतीमुळे त्याला या स्पर्धेती माघार घ्यावी लागली आहे.

### नीरज चोप्राला कशी झाली दुखापत?

दोन आठवड्यांपूर्वी प्रशिक्षणादरम्यान नीरज चोप्रा जखमी झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे तो ओस्ट्रावामध्ये भालाफेक करू शकणार नाही. नीरज चोप्राने भुवनेश्वरमध्ये पुरुषांच्या भालाफेकच्या अंतिम फेरीत ८२.२७ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नाने सुवर्णपदक जिंकले होते. बुधवारी, १५ मे रोजी कलिंगा स्टेडियमवर चार थ्रो केल्यानंतर ऑलिम्पिक चॅम्पियन थांबला. हा थ्रो त्याच्या वैयक्तिक सर्वोत्तम ८८.९४ मीटरपेक्षा खूपच कमी होता, जो त्याने २०२२ मध्ये स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये केला होता.

### कार्यक्रमाला पाहुणा म्हणून उपस्थित राहणार –

आयोजक म्हणाले, दोन आठवड्यांपूर्वी प्रशिक्षणादरम्यान त्याला झालेल्या दुखापतीमुळे तो ऑस्ट्रावामध्ये भालाफेक करु शकणार नाही, परंतु तो या कार्यक्रमाला पाहुणा म्हणून उपस्थित राहील. १० मे रोजी दोहा डायमंड लीगमध्ये ८८.३६ मीटरच्या प्रभावी थ्रोसह रौप्य पदक जिंकून २०२४ च्या हंगामाची जोरदार सुरुवात केली. यानंतर जवळपास तीन वर्षांनंतर तो देशांतर्गत स्पर्धेत परतला आणि १५ मे रोजी फेडरेशन कपमध्ये ८२.२७ मीटर थ्रोसह सुवर्णपदक जिंकले होते.



## चार जून नंतर काहींचा करेक्ट कार्यक्रम

# पाटील-कथोरे वाद पेटला

कल्याण : मुरबाड येथील शिवळे येथे शुक्रवारी रात्री आयोजित केलेल्या मोजक्या भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना केंद्रीय मंत्री आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार कपील पाटील यांनी नाव न घेता मुरबाडचे भाजप आमदार किसन कथोरे यांना लक्ष्य केल्याने, येत्या काळात मागील दोन महिन्यांपासून शमलेला कथोरे-पाटील वाद पुन्हा जोरदार पेटण्याची चिन्हे आहेत.



*भिवंडी लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर मोजक्या भाजप पदाधिकाऱ्यांशी (पाटील समर्थक) संवाद साधावा म्हणून केंद्रीय मंत्री कपील पाटील शुक्रवारी मुरबाड जवळील शिवळे येथील मुरबाडचे माजी आमदार गोटीराम पवार यांचे चिरंजीव सुभाष पवार यांच्या कार्यालयात आले होते. या बैठकीत त्यांनी आपल्या मोजक्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. मतदान आणि पुढची व्यूहनिती या विषयी चर्चा केली.*

### त्यांचे नाव घेऊन आपण त्यांना नाहक मोठेपण करू इच्छित नाही

या बैठकीनंतर माध्यम प्रतिनिधींनी मंत्री कपील पाटील यांच्याशी संवाद साधला. तुमच्या विजयात मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांचा किती वाटा असेल, असा प्रश्न पत्रकारांनी कपील पाटील यांना करताच संतप्त स्वरात कपील पाटील यांनी,' ज्या माणसाने आपल्या विरोधात उघडपणे काम केले. तुतारी आणि इतरांची मतदान केंद्र परिसरात मंच लावण्यासाठी साहाय्य केले. त्या माणसाचा आपल्या विजय आणि मताधिक्यात काय संबंध असेल. आपण यामध्ये कोणाचेही नाव घेत नाही. त्यांचे नाव घेऊन आपण त्यांना नाहक मोठे पण करू इच्छित नाही,' असे सांगून कपील पाटील यांनी कथोरे यांनी भिवंडी लोकसभा मतदार संघ निवडणुकीच्या वेळी मुरबाड मतदारसंघात काम केले नसल्याचे स्पष्ट केले. पाटील यांच्या या विधानावरून येत्या काळात पाटील, कथोरे वाद चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मागील दोन वर्षापासून कपील पाटील यांनी भिवंडी लोकसभा मतदारसंघ, ठाणे जिल्हा भाजप कार्यकारिणीतून कथोरे समर्थकांना डावलण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे नाराज झालेल्या कथोरे समर्थकांनी याविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. हा वाद सुरू असताना पाटील यांच्याकडून कथोरे हे कुणबी समाजातील असल्याने आगरी, कुणबी वाद पेटवला. जागोजागी कथोरे यांची कोंडी करण्याचे प्रयत्न केले. कथोरे यांनीही शांत राहून प्रदेश नेत्यांना सुरू असलेल्या घटनांची माहिती देऊन भाजपचे कार्य सुरू ठेवले.

दरम्यानच्या काळात कथोरे यांनी भिवंडी लोकसभा निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे पाटील यांचा राग अनावर झाला. तेव्हापासून ते कथोरे यांना जागोजागी पाण्यात पाहू लागले. पाटील, कथोरे वाद भाजपच्या मुळावर येईल म्हणून भाजप नेत्यांनी यात दिलजमाई करून हा विषय मिटवला. पण अंतर्गत धग कायम होती. लोकसभा निवडणूकीच्यावेळी कथोरे यांनी कपील पाटील यांच्या प्रचाराचे काम केले. कार्यकर्त्यांनी कथोरे यांना पाटील यांनी दिलेल्या त्रासाची माहिती असल्याने त्यांनी निवडणुकीत त्याचे उट्टे काढण्याची भाषा केली होती. कथोरे यांनी भाजप कार्यकर्त्यांना शांत करून समजावून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी कपील पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडणूक आणण्याचे आणि मुरबाड मतदारसंघातून अधिकचे मताधिक्य देण्याचे आवाहन केले होते. कथोरे पाटील यांच्या प्रचारात सहभागी झाले तरी त्यावर पाटील समाधानी नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

# पालघरमधील समुद्रकिनारे पर्यटकांनी बहरले



पालघर : शाळांना उन्हाळी सुटी, तसेच लोकसभेसाठी मतदान झाल्याने मोकळेपणा मिळावा म्हणून नागरिक सहकुटुंब घराबाहेर पडत आहेत. मुंबई, ठाणे, नाशिकसह गुजरात राज्यातील पर्यटकांचे आवडते ठिकाण म्हणजे केळवे, बोर्डी, शिरगावमधील समुद्रकिनारे. उष्णतेने कहर केल्यावरसुद्धा जिल्ह्यातील समुद्रकिनारे पुन्हा पर्यटकांनी फुलू लागले आहेत.

पालघरमधील शांत, स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांचे शहरातील पर्यटकांना नेहमीच आकर्षण आहे. शाळा, महाविद्यालयाच्या परीक्षा, तसेच निवडणुकीचा हंगाम संपल्याने पर्यटकांनी केळव्याकडे पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. या ठिकाणी दररोज हजारो प्रवासी येत आहेत. केळवा हे सुरक्षित ठिकाण आहे. तसेच पालघर, बोईसर, डहाणू, विरार, सफाळे येथे कौटुंबिक पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. लांबलचक समुद्रकिनारा केळव्याला लाभला असून या किनाऱ्याच्या आकर्षणामुळे पर्यटक येथे आवर्जून हजेरी लावतात. याचबरोबर शीतलादेवीचे भव्य मंदिर, निसर्गसौंदर्य ठिकाण असल्याने पर्यटक दरवर्षी मोठ्या प्रमाणात येत असतात. या पर्यटकांमुळे स्थानिकांना चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे. मोठ्या प्रमाणात शहाळी, रानमेवा, चिंचा, ताडगोळे या बरोबरीने अनेक खाद्यपदार्थांचे स्टॉल किनाऱ्यावर पर्यटकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत.

### व्यावसायिकांनाही चांगले दिवस

समुद्रकिनाऱ्यावर घोडा गाडी, उंट, त्याचप्रमाणे समुद्रातील बोटिंग, बीच बग्गी याचा आनंदही पर्यटक मोठ्या प्रमाणात लुटत आहेत. मुलांच्या परीक्षा संपल्या असल्या तरीही कडक उन्हामुळे सुट्टी संपण्याच्या वेळी पर्यटकांनी पुन्हा आपले पाय समुद्रकिनाऱ्याकडे वळवले आहेत. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांनाही चांगले दिवस आले आहेत. समुद्रकिनाऱ्यांचे आकर्षण असल्याने हॉटेल, लॉज, घरगुती राहण्याची, जेवणाची ठिकाणे येथे उन्हाळ्याच्या सुटीत पर्यटकांची गर्दी होत आहे.

*पालघरमधील समुद्रकिनारे स्वच्छ, तसेच या ठिकाणी ताजी मासळी, उत्कृष्ट घरगुती जेवण मिळत असल्याने दोन-तीन दिवसांच्या पर्यटनासाठी दरवर्षी पालघरमध्ये येतो.*
*- दिनेश गावडे, पर्यटक, मुंबई*

# धैर्य पाटीलची शतकी खेळी



पनवेल : मुंबईचा १४ वर्षांखालील मुलांचा संघ निवडण्यासाठी खेळविण्यात येणाऱ्या ड्रीम ११ चषक निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या दिवशी धैर्य किशोर पाटील याच्या शतकी (१०७ धावा) खेळीमुळे सुनील गावस्कर संघाने दिलीप वेंगसरकर संघाविरुद्ध आपल्या पहिल्या डावात २७७ धावांची मजल मारली. धैर्यने आपल्या शतकी खेळीदरम्यान १६३ चेंडूंचा सामना करताना १६ चौकार आणि एक षटकार मारला. धैर्य हा पनवेल तालुक्यातील कोपर गावचा असून उलवा नोड मधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील आयथिन्क स्पोर्ट्स अकॅडमी आणि चेंबूर येथील अचिव्हर क्रिकेट अकॅडमी मध्ये क्रिकेटचे धडे घेत असून धैर्य हा सुनील गावस्कर संघाचा कर्णधार आहे.

### अपघात घडल्यास जबाबदार कोण?



*ठाण्यात मध्यरात्री युवक युवतीचे झुंबड माजिवडा नका येथे रात्रभर सिगरेट, चहा, इडली खाण्यासाठी गर्दी या ठिकाणी मुंबई हुन युवक युवती येत असल्याचे समजते महत्वाचे सगळीकडे ठाण्यात विविध ठिकाणी पोलिसांकडून नाकाबंदी केली असून मात्र या ठिकाणी कापूरबावडी पोलीस स्थानकच्या हाके वर असून याकडे प्रसाशान लक्ष देणार का याकडे लक्ष लागले आहे, असे नागरिक सवाल करत आहे. (छाया : मनोज सिंह )*

# डोंबिवली स्फोट प्रकरण : मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

डोंबिवली : डोंबिवलीतील अमुदान कंपनीत झालेल्या रिक्टरच्या शक्तिशाली स्फोटानंतर ३ कंपन्यांतील बेपत्ता झालेल्या १२ जणांची तक्रार त्यांच्या निकटवर्तीयांसह नातेवाईकांनी पोलिसांकडे केली आहे. गेल्या ४८ तासांत आतापर्यंत ३ मृतदेहांची ओळख पटली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या स्फोटात १३ मृतदेह सापडले असून २ जणांचे फक्त अवशेष सापडले आहेत. त्यातच शनिवारी दिवसभरात ३ मृतदेह हाती लागल्याने मृतांची संख्या १६ झली आहे. अद्याप मलबा उचलण्याचे काम संपलेले नसल्याने या मलब्याखाली अजूनही मृतदेह गाडले असावेत, असा तपास यंत्रणेचा अंदाज आहे. त्यामुळे या दुर्घटनेत बेपत्ता झालेल्या मृतदेहांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गुरूवारी (दि.२३) दुपारी झालेल्या दुर्घटनेत ६८ जखमी झाले. या जखमींना खासगी आणि केडीएमसीच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यातील ४२ जणांना रूग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. तर २६ जणांवर उपचार सुरू



आहेत. पैकी १२ रूग्णांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार आहेत.

या दुर्घटनेत तीन कंपन्यातील १२ जण बेपत्ता असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या. शोध मोहिमेत १० जणांचे मृतदेह हाती लागले असून २ जणांचे अवशेष सापडले आहेत. अमुदान कंपनीमधील १०, दत्तवर्ण कॉसमॉस कंपनीमधील १ आणि सप्तवर्ण कंपनी मधील १ असे १२ कामगार बेपत्ता होते. याची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

शोध मोहिमेत मृतदेह आणि मानवी अवशेष सापडले आहेत. अमुदान कंपनीमधील १०, कॉसमॉस कंपनीमधील १ आणि सप्तवर्ण कंपनीतील १ असे १२ जण बेपत्ता होते. यातली ३ जणांची ओळख पटली आहे. तर ७ जणांचे मृतदेह आणि अवशेषांची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या नातेवाइकांचे डीएनए सॅम्पल घेण्यात आले आहेत. ओळख पटल्यानंतर हे मृतदेह त्यांच्या कुटुंबियांच्या ताब्यात दिले जाणार आहेत.

एनडीआरएफ आणि अग्निशामक दलाची टीम गेल्या ४८तासांपासून घटनास्थळी बचावकार्य करत आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना शोधून बाहेर काढण्याचे काम अद्यापही सुरू आहे. शनिवारी सकाळी २ मानवी अवशेष सापडले आहेत. दुसरीकडे, या दुर्घटनेत आपल्या नातेवाईकांचा मृत्यू झाला आहे का? याची खात्री पटत नसल्याने कंपन्यांतून काम करणाऱ्या कामगारांचे कुटुंब हताश झाले आहे. अजूनही आपले वडील, भाऊ, मुलगा, मुलगी सुखरूप परत येईल अशा हताश नजरेने नातेवाईक हॉस्पिटलबाहेर फेऱ्या मारत आहे.

खासगी आणि शासकीय रुग्णालयांसह पोस्टमार्टम रूममध्ये आपल्या नातेवाईकांची शोधाशोध ते करत आहेत. आपली बेपत्ता झालेली व्यक्ती सापडत नसल्याने या नातेवाईकांनी कंपन्यांच्या परिसरात जमा होऊन शोध घेण्यास सुरुवात केली. आपल्या बेपत्ता व्यक्तीचा शोध घेणाऱ्यांना प्रशासन योग्य वागणूक देत नसल्याचा आरोप करत नातेवाईकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## हद्दपार आरोपीस अटक

ठाणे : चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारी कारवाया वाढल्यामुळे गुंड शाहबाज मकबुल हमीद खान (२०) याच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपआयुक्त परिमंडळ-५ यांनी शाहबाज याला १८ महिन्याकरिता हद्दपार केले होते. मात्र शाहबाज हा प्रतिबंधित परिसरात लपून वावरत असताना मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाच्या पथकाने गुरुवार (ता-२३ मे) रोजी संध्याकाळी ४-४० सुमारास धर्मवीर नगर येथून अटक केली. त्याच्या विरोधात चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आलेली आहे.

# घोडबंदर रस्ता बंद असल्याने भिवंडीत कोंडी

भिवंडी : ठाणे-घोडबंदर रस्ता बंद असल्यामुळे या मार्गावरील वाहतूक भिवंडी-नाशिक महामार्गाद्वारे चिंचोटीकडे वळविण्यात आली आहे. यामुळे ठाणे-भिवंडी महामार्गासह चिंचोटी-अंजूरफाटा मार्गावर मागील तीन दिवसांपासून प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. या मार्गावर शनिवारी (ता. २५) सुमारे पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्याचप्रमाणे रविवारीदेखील (ता. २६) वाहतूक कोंडी झाली होती.

महामार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने छोट्या वाहनचालकांनी शहरातील अरुंद रस्त्यावरून आपला मार्ग वळवला. परिणामी शहरात देखील मोठ्या प्रमाणात कोंडी झाली होती. मानकोली, वसई रोड, ठाणे, पडघा, भिवंडी अशा अनेक मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिक आणि वाहनचालकांना या कोंडीचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. मुंबईहून अहमदाबाद-गुजरातला जाण्यासाठी जड व अवजड वाहने घोडबंदर मार्गाचा अवलंब करतात; परंतु ठाणे-घोडबंदर मार्ग बंद केल्याने ही सर्व वाहने मुंबई-नाशिक महामार्गावर वळविण्यात आली. सध्या या मार्गावर रस्तारुंदीकरणाचे काम सुरू आहे. अशा स्थितीत या जादा वाहनांची भर पडल्याने या मार्गावर सकाळपासून वाहनांचा वेग कमी होऊन कोंडी झाली होती. तसेच ही वाहने वसईमार्गे वळविण्यासाठी माणकोली-अंजूरफाटा-चिंचोटी या महामार्गावर पाठविण्यात आली; परंतु चिंचोटी मार्गावरदेखील अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे असल्याने वाहनांचा वेग कमी होऊन सुमारे पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रंग लागल्या होत्या. भिवंडीत सध्या जड-अवजड वाहनांना बंदी आहे. असे असताना या दरम्यान काही वहानांनी शहरात प्रवेश घेतल्याने शहरातील वाहतूक विस्कळित झाली. रस्ते वाहतूक प्रशासनाने कोणताही रस्ता बंद करताना पर्यायी रस्त्यांची स्थिती पाहणे आवश्यक आहे, तसेच त्या रस्त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया अनेक चालकांनी दिली.

### आग



*कैसल मिल येथील दिल्ली जायका हॉटेलमध्ये आग लागली होती. या आगीत कोणालाही दुखापत नाही. मात्र हॉटेल चे संपूर्ण सामान जाळून खाक झाले. (छाया : मनोज सिंह)*

# महिलेवर सुऱ्याने हल्ला तरुणाला २ वर्षाच्या कारावासाची शिक्षा

ठाणे : नारळपाणी विक्रीचा धंदा करणाऱ्या महिलेवर हातगाडीवरील सुऱ्याच्या सहाय्याने जीवघेणा हल्ला केल्या प्रकरणाची अंतिम सुनावणी शुक्रवार (ता-२४ मे) रोजी ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश सूर्यकांत शिंदे यांनी सरकारी आणि बचाव पक्षाच्या वकिलाचा युक्तीवाद न्यायालयात सरकारच्या वतीने सादर केलेले सबळ पुरावे आणि साक्षीदार यांना ग्राह्य धरीत मुंबईत राहणाऱ्या राजेश रंगा कुचिकरवे (३१) याला जीवघेणा हल्लाप्रकरणी दोषी ठरवीत दोन वर्षाचा सश्रम करावासाची शिक्षा आणि ५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली. दंडाची रक्कम न भरल्यास ३ महिन्याचा कारावास निकालात नमूद करण्यात आलेला असल्याची माहिती विशेष सरकारी संजय मोरे यांनी दिली.

सदरची घटना २७ जानेवारी, २०१७ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली होती. घटनेच्या दिवशी तक्रारदार संगीता दवणे (३८) या आपली मुलगी तेजस्विनी हिच्या सोबत २७ जानेवारी, २०१७ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ठाण्याच्या गोकुळनगर परिसरात गायकवाड यांच्या नारळपाणी विक्रीच्या हातगाडीवर नारळपाणी पिण्यासाठी आल्या होत्या. त्याचवेळी राजेश कुंचीकरवे हा घटनास्थळी आला. त्याने हातगाडीवर नारळ फोडण्यासाठी वापरात असलेले सुरा घेऊन नारळपाणी विक्रेत्या सुनंदा गायकवाड यांच्यावर राजेश याने जीवघेणा हल्ला केला. तसेच गाडीवरील गल्ल्यामधील पैसे चोरण्याचा प्रयत्न केला. तक्रारदार संगीता दवणे यांनी आणि त्यांच्या मुलीने हल्लेखोर राजेश याला प्रतिकार केला. घटनास्थळी झालेल्या आरडाओरडीत रस्त्यावरील नागरिकांनी राजेश कुचीकरवे याला पकडून राबोडी पोलिसांच्या स्वाधीन केले. राबोडी पोलिसांनी राजेश याच्यावर महिलेवर प्राणघातक हल्ला प्रकरणी गुन्हा दाखल केला. सदर प्रकरण ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश सूर्यकांत शिंदे यांच्या दालनात अंतिम सुनावणीसाठी आलेला होता. सरकारी वकील संजय मोरे यांनी न्यायालयात केलेला युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे अन साक्षीदार यांची साक्ष गृहीत धरीत न्यायधीश शिंदे यांनी हल्लेखोर राजेश याला दोषी ठरवीत शिक्षा ठोठावली. सदर प्रकरणाचा तपास हा तात्कालीन राबोडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनीही या खटल्यात सहकार्य केले.

# मोबाईल चोरामुळे तरुणाने गमावले दोन्ही पाय

ठाणे (गणेश भोईटे) : माझ्या हातावर काठीचा फटका पडला आणि मी लोकलमधून खाली पडलो. माझ्यासोबत काय घडलं आहे ते काही काळ मला समजलचं नाही. मी वाचवा वाचवा ओरडत होतो, लोक मदतीला आले आणि मला रुग्णालयात दाखल केलं. पायावरून लोकल गेली आणि दोन्ही पाय गमावल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. यापुढे मी कधीच उभा सुध्दा राहू शकत नाही. अशी खंत एका (३१ वर्षीय) तरुणाने व्यक्त केली.



जगन लक्ष्मण जंगले या प्रवाशाच्या हातावर गर्दुल्याने फटका मारल्याने तो लोकलमधून खाली पडल्याने गंभीर जखमी झाला. त्याच्यावर दोन्ही पाय गमावण्याची वेळ आली आहे. या घटनेने तीव्र संताप व्यक्त होत असून, यातील नेमक्या प्रकाराचा आणि आरोपीचा शोध घेण्यात येत असल्याचे ठाणे रेल्वे पोलिसांनी सांगितले.

### तीन महिन्यांपूर्वीच जगन यांचे लग्न झाले होते

दादरमधील मॅजेस्टिक बुक स्टॉल येथे कामाला असलेले जगन हे कल्याण येथील रहिवासी आहेत. तीन महिन्यांपूर्वीच जगन यांचे लग्न झाले. नेहमीप्रमाणे जगन यांनी २२ मे रोजी कल्याणला जाणारी लोकल रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास दादर स्थानकातून पकडली. ठाणे स्थानक सोडल्यानंतर दरवाजात उभे असलेल्या जगन यांच्या हातातील मोबाइल हिसकावण्यासाठी एका गर्दुल्याने त्यांच्या डाव्या हातावर लाकडी दांडक्याने फटका मारला. यात तोल गेल्याने जगन हे फलाट क्रमांक दोनपासून २०० मीटर पुढे लोकलमधून खाली पडले. त्याचवेळी त्यांचा मोबाइलही गहाळ झाला. या घटनेमध्ये जगन यांच्या दोन्ही पायांवरून लोकलचे चाक गेल्यामुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांना रेल्वे पोलिसांसह काही प्रवाशांच्या मदतीने तातडीने कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल केले होते. मात्र पायावर तातडीने शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याने त्यांना ठाण्यातील ढोकाळी येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी दोन्ही पाय शस्त्रक्रिया करून कापावे लागले.

या प्रकरणी ठाणे रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, जगन हे नेमके कसे पडले, त्यांना कोणी पाडले, त्यांचा मोबाइल कोणी हिसकावला? या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येत असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.

जगन यांचे तीन महिन्यांपूर्वीच लग्न झाले आहे. सुदैवाने, या अपघातात त्यांचा जीव वाचला असला तरी त्यांना दोन्ही पाय गमवावे लागले आहेत. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीला पकडून कठोर कारवाईची, तसेच रुग्णालयीन खर्च व रेल्वे प्रशासनाने भरपाई द्यावी
- प्रशांत शिंदे , नातेवाईक

अशा परिस्थितीत रुग्णाचा जीव वाचवणे सर्वात महत्त्वाचे असते. हा रुग्ण आमच्याकडे आला तेव्हा मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. त्याला ३ ते ४ बाटल्या रक्त चढविण्यात आले. त्यांनतर आमची टीम त्याची प्रकृती नियंत्रणात आणण्यासाठी रात्रभर प्रयत्न करत होती. त्याचे दोन्ही पाय कापावे लागले असून यापुढे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. यासाठी मोठा खर्च आहे.
-डॉ. बाबासाहेब चव्हाण (अस्थिरोग तज्ञ, हायलँड हॉस्पिटल)

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१